नियमीत फौ. ख. क्र. ७४/२०२३
सरकार -वि.- राहूल व इतर
नि.क्र. १६.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अयुब खान अजीज खान पठान,
वय ४० वर्षे, व्यवसाय – होमगार्ड,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखत नाही. दिनांक २४.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. त्यानंतर मी मालेवाडाफाटा येथे गेलो होतो तेथे पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनाम्याची कारवाई केली होती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. पोलिसांनी त्यावेळी फोटो काढले होते. आता मला दाखविलेले फोटो तेच आहे. त्यास **आर्टिकल अ व ब** देण्यात येते.
सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला समन्स दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला सही करण्यास सांगितले म्हणून मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा मी वाचून पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात काय लिहीले आहे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी होमगार्ड असल्यामुळे मला पोलिसांसोबत जावे

लागते व चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावर पोलीस स्टेशनमध्ये सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्याठिकाणी सही केली तेथे कुठलीही गाडी नव्हती.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – ०७.११.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.